दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
Scan QR code to visit ... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १७६ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२८ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# प्रकाश आंबेडकरांची मनोज जरांगे यांच्यासोबत नवी आघाडी

## 'वंचित'ने ८ उमेदवार केले जाहीर; तर नागपुरात काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा

**अकोला (वृत्तसंस्था)**–प्रकाश आंबेडकर यांनी थेट मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांच्यासोबत नवी आघाडी केली आहे. वंचित बहुजन आघाडीला लोकसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातील उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यामुळे ते आता महाविकास आघाडीसोबत नसणार हे स्पष्ट झाले आहे. यामुळे मविआला धक्का बसला आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, काल राज्य कार्यकारिणीची बैठक झाली त्यात काही निर्णय झालेत. काल रात्री मी मनोज जरांगे पाटील यांना भेटलो. विस्ताराने बोलणे झाले. त्यात ओबीसीसोबत आघाडीचा निर्णय घेतला गेला. संजय राऊतांनी थोड्याच वेळापूर्वी आपण वंचितसाठी काही जागांवरील उमेदवार जाहीर केले नाही, अजून वेळ आहे त्यांनी मविआसोबत यावे असे म्हटले होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मुस्लीम, जैन समाजाला उमेदवारी देण्याचा निर्णय झाला. जास्तीत जास्त उमेदवार गरीब वर्गातील असतील. पहिल्या टप्प्यातील उमेदवारांना जरांगेंचे समर्थन असेल. ते त्यांची अंतिम भूमिका ३० तारखेला घेतील. जरांगेंनी ३० तारखेपर्यंत थांबायची विनंती केली. त्यांची विनंती मान्य केली. जरांगे आणि दोघे मिळून लढणार, असे प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केले आहे.वंचित बहुजन आघाडी राज्य समितीने नागपूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला आहे. नागपूर लोकसभा मतदारसंघातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ठाकरे यांना पाठिंबा देण्यात येणासर आहे. सांगली लोकसभा मतदारसंघातून प्रकाश शेंडगे (ओबीसी बहुजन पक्ष) यांनी निवडणूक लढविल्यास त्यांना पाठिंबा देण्याचा निर्णय राज्य समितीने घेतला आहे. २७ मार्च रोजी दुपारी ४ वाजता रामटेक लोकसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराची घोषणा केली जाईल.बहुजन महासंघाचा अविश्वसनीय अकोला पॅटर्न प्रकाश आंबडेकर यांनी यापूर्वी यशस्वी करुन दाखवला होता. त्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला नसला तरी या पॅटर्नला कोणत्याही पक्षाल दुर्लक्षित करता आलेले नाही. गेल्या वर्षाच्या मध्यानंतर राज्यात मराठा समाजाने आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून आले. या सर्व घडामोडींकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही, असे सांगत प्रकाश आंबेडकर यांनी राज्यात नवीन प्रयोगाला बळ दिले.आम्ही जे मुद्दे मांडले, त्या मुद्द्यांना महाविकास आघाडीने प्रतिसाद न दिल्यामुळे आम्ही हा निर्णय घेत असल्याचे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, आम्ही नवीन आघाडी तयार करत आहोत. जरांगे पाटलांच्या फॅक्टरकडे तुम्ही दुर्लक्ष करू नका, असे आम्ही महाविकास आघाडीला सांगितले होते. मात्र त्यांनी लक्ष दिले नाही. वंचितचा वापर ते घराणेशाही वाचवण्यासाठी करत होते. त्यामुळे आम्ही आता वेगळा निर्णय घेत आहोत. या निर्णयावर मोठ्या प्रमाणात टीका होणार आहे, हे मला माहीत आहे. मात्र मी लोकांची नस ओळखतो असे म्हणत प्रकाश आंबेडकर यांनी स्वतंत्रपणे निवडणुकांना सामोरे जाण्याचा निर्णय घेतला आहे.







नागभीड तालुक्यातील नवानगर(बोन्ड )येथे गहू या रब्बी पिकाची कापणी करतांना स्त्री मजूर छाया :प्रणय बांगरे.

## १३–चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी ११ नामनिर्देशन पत्र दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २६ मार्च २०२४ रोजी ७ उमेदवारांनी ११ नामनिर्देशन पत्र दाखल केले.

मंगळवार, दि. २६ मार्च रोजी विनोद कवडूची खोब्रागडे (अपक्ष), अशोक राणाजी राठोड (जय विदर्भ पाटी), अवचित श्यामराव सयाम (जनसेवा गोंडवाना पाटी), मधूकर विठ्ठल निस्ताने यांनी २ अर्ज (प्राऊटिस्ट ब्लॉक इंडिया), धानोरकर प्रतिभा सुरेश (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), मुनगंटीवार सुधीर सच्चिदानंद यांनी ४ अर्ज (भारतीय जनता पार्टी) आणि अतुल अशोक मुनगीनवार (अपक्ष) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. मंगळवारी १६ इच्छूकांनी अर्जाची उचल केली आहे.नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याचा उद्या बुधवार शेवटचा दिवस आहे. उद्या सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्रे सादर करता येतील. २८ मार्च रोजी नामनिर्देशनपत्रांची छानणी करण्यात येणार आहे. ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

## वन हक्क समितीच्या सतर्कतेणे जंगलातील आग आटोक्यात



**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

ब्रम्हपुरी तालुक्यातील धामणगाव जवळील जंगलात अज्ञात मोहफूल गोळा करणाऱ्या व्यक्तीनी लावलेली आग जंगलात पसरली. जवळच लागून असलेल्या वायगाव येथील वनहक्क समितीचे स्त्री पुरुष मजूर जंगल संरक्षण आणि पोषणचे काम करीत असताना त्यांना ही आग दिसली.

ही आग मशीनद्वारे आणि झाडाच्या फान्द्या द्वारे आग विझवून आटोक्यात आणली.

तुलणमाल, धामणगाव, आणि वायगाव जंगल परिसर लागून असल्यामुळे होत असलेली मोठी जंगलहानी मजुरांच्या सतर्कतेणे टळली.

## मतदारानों,तुम्हीच आहात चंद्रपूर लोकसभा क्षेत्राचे उमेदवार–ना.सुधीर मुनगंटीवार

### कार्यकर्त्यांच्या प्रचंड उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जात–पात धर्माचा विचार न करता संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्याच्या चौफेर विकासासाठी मी काम केले आहे. आताही गोरगरीबांच्या कल्याणाचे ध्येय ठेवूनच मी निवडणूक लढविणार आहे. अशा स्थितीत कुठल्याही जातीय आमिषांना किंवा भावनिक आवाहनांना बळी न पडता आपल्या मनाचे ऐका. आपल्याला पुढील पाच वर्षे दुःखात घालवायची आहेत की आनंदात, याचा विचार करा, असे आवाहन करीत ना. सुधीर मुनगंटीवार यांनी 'देशाच्या विकासासाठी असलेल्या या निवडणुकीत मी तुमचा उमेदवार म्हणून उभा नाही तर तुम्हीच सारे उमेदवार आहात,' या शब्दांत जनतेच्या हृदयाला स्पर्श केला.



भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मंगळवारी, २६ मार्च २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, आमदार संजीव रेड्डी बोदकुरवार,आमदार डॉ. संदीप धुर्वे, सपना मुनगंटीवार, राजेंद्र गांधी, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, यांच्यासह महायुतीतील व घटक पक्षातील सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. 'सुधीर भाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं', 'अब की बार ४०० पार' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, देशगौरव मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी विश्वास दाखवत चंद्रपूर–वणी–आर्णी लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढण्याची संधी दिली. आज निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी 'आशीर्वाद यात्रेत' हजारों लोकांचा आशीर्वाद प्राप्त केला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार, माजी आमदारांसह शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आणि मित्र पक्षातील सर्व पदाधिकारी यांनी उपस्थित राहून मला शुभेच्छा दिल्या.तुलना करायचीच असेल तर विकासाची, प्रगतीची करा. मी आजपर्यंत दिलेला प्रत्येक शब्द पूर्ण केला आहे. मी जर निवडून आलो तर नवकल्पनांच्या माध्यमातून वार्ड, प्रभाग, गाव, शहर यांच्या विकासासाठी पूर्ण शक्तिनिशी प्रयत्न करील. तुमचा आशीर्वाद मला भारताला भूकमुक्त, आतंकमुक्त, विकासयुक्त तसेच भारताच्या गौरव वाढविण्यासाठी पाहिजे आहे, असे ना. मुनगंटीवार म्हणाले.

### नितीन गडकरींनी ध्वस्त केला होता काँग्रेसचा गड

## २०१४ मध्ये नागपूर लोकसभेचे मैदान नव्हते सोपे, पण बड्या नेत्याला चारली होती धूळ

**नागपूर (वृत्तसंस्था)**–केंद्रीय मंत्री तथा भाजपचे बडे नेते नितीन गडकरी यांनी बुधवारी नागपूर लोकसभा मतदार संघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी, त्यांनी एका सभेला संबोधित केले. त्यात त्यांनी पुन्हा एकदा या मतदार संघातून मोठ्या मताधिक्याने लोकसभेवर जाण्याचा विश्वास व्यक्त केला.



भाजपने सलग तिसऱ्यांदा नितीन गडकरींना नागपूरच्या मैदानात उतरवले आहे. यापूर्वी २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपच्या उमेदवारीवर ते संसदेत पोहोचले होते. त्यात २०१४ मध्ये त्यांनी पहिल्यांदा लोकसभेची निवडणूक लढवली होती. तत्पूर्वी, १९८९ ते २००९ पर्यंत सलग २० वर्षांपर्यंत ते विधान परिषदेचे सदस्य म्हणून कार्यरत होते. पण २००९ मध्ये भाजपच्या संसदीय मंडळाने त्यांची पक्षाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आणि कालांतराने त्यांना लोकसभेच्या मैदानात उतरावे लागले.नितीन गडकरी खासदार होण्यापूर्वी नागपूर लोकसभा मतदार संघ काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असतानाही २०१४ पूर्वी भाजपने ही जागा केवळ एकदा जिंकली होती. १९९६ मध्ये बनवारी लाल यांनी पहिल्यांदा भाजपच्या तिकीटावर ही जागा जिंकली होती. हा अपवाद वगळता बहुतांश वेळा हा मतदार संघ काँग्रेसच्याच ताब्यात राहिला.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने नितीन गडकरींना नागपूर लोकसभा मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. तेव्हा त्यांच्यासाठी परिस्थिती फारशी अनुकूल नव्हती. त्यांचा मुकाबला काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास मुत्तेमवार यांच्याशी होता. ते १९९८, १९९९, २००४ व २००९ अशा सलग ४ निवडणुकांत काँग्रेसच्या तिकिटावर नागपुरातून लोकसभेवर पोहोचले होते. पण नितीन गडकरी यांनी आपल्या पहिल्याच निवडणुकीत केवळ काँग्रेसचा हा बालेकिल्लाच उद्ध्वस्त केला नाही तर मोठ्या अंतराने विजयही मिळवला.२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या विलामम मुत्तेमवार यांना ३,०२,९३९ मते मिळाली. तर नितीन गडकरी यांच्या पारड्यात ५,८७,७६७ मते गेली. म्हणजे गडकरी यांनी विलास मुत्तेमवार यांना २.५ लाखांहून अधिक मतांनी पराभवाची धूळ चारली.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने सलग दुसऱ्यांदा नितीन गडकरी यांना नागपूरची उमेदवारी दिली. काँग्रेसने त्यांच्याविरोधात नाना पटोले यांना उमेदवारी दिली. पण या निवडणुकीतही गडकरींचा करिष्मा कामी आला आणि भाजपने पुन्हा एकदा ही सीट आपल्या खिशात घातली. या निवडणुकीतही गडकरी २ लाखांहून अधिक मतांनी विजयी झाले. नितीन गडकरी यांनाना ६,६०,२२१ मते मिळाली. तर नाना पटोले यांना ४,४४,२१२ मतांसह दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.उल्लेखनीय बाब म्हणजे २०२४ मध्ये भाजप नागपूरमधून नितीन गडकरी यांच्याऐवजी अन्य एखाद्या नेत्याला उमेदवारी देईल अशी अटकळ व्यक्त केली जात होती. पण ही अटकळ हवेतच विरली. काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात भाजपचे वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या गडकरींना भाजपने पुन्हा एकदा उमेदवारी दिली. आता त्यांचा सामना काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्याशी होणार आहे. त्यामुळे गडकरी येथून विजयाची हॅट्ट्रिक साधणार की काँग्रेस पुनरागमन करणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.









२६ मार्च रोजी चंद्रपूर लोकसभा मतदार संघाकरीता नामांकन अर्ज दाखल करताना उमदवार व कार्यकर्ते

# भारतीय लोकांमध्ये व्यापक पाठिंबा!

**भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली.**

इंडियन इंडिपेंडन्स लीगला आयआयएल म्हणूनही ओळखली जाते. ही एक राजकीय संघटना होती जी १९२० ते १९४०च्या दशकात ब्रिटिश भारताबाहेर राहणाऱ्यांना या प्रदेशावरील ब्रिटिश वसाहतवादी शासन हटवण्याच्या प्रयत्नात संघटित करण्यासाठी चालवली गेली. भारतीय राष्ट्रवादींनी स्थापन केलेले, त्याचे उपक्रम आग्नेय आशियातील विविध भागांमध्ये आयोजित केले गेले. त्यात भारतीय प्रवासी आणि नंतर, दुसऱ्या महायुद्धाच्या पहिल्या भागात जपानच्या यशस्वी मलायन मोहिमेनंतर जपानी ताब्यांतर्गत निर्वासित भारतीय राष्ट्रवादीचा समावेश होता. मलायावरील जपानी ताब्यादरम्यान, जपानी लोकांनी मलायामधील भारतीयांना लीगमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित केले.

भारतीय स्वातंत्र्य लीगची स्थापना तारकनाथ दास यांच्यासह पांडुरंग खानखोजे यांनी केली होती. तारकासुर दास यांनी इंग्रजी व गुरुमुखी आवृत्तीत फ्री हिंदुस्तान सुरू केले. कृपया, लक्षात घ्या की ब्रिटीशांची वसाहतवादी राजवट काढून टाकण्यासाठी रासबिहारी बोस यांनी दि.२८ मार्च १९४२ रोजी जपानच्या टोकियो येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. प्रामुख्याने भारतीय राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीला जपानी पाठिंबा मिळवण्यासाठी स्थापन करण्यात आलेली लीग विसर्जित होण्यापूर्वी मोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या भारतीय राष्ट्रीय लष्कराशी संवाद साधण्यासाठी आणि कमांड देण्यासाठी स्थापन करण्यात आली. रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांच्याकडे आईएनए सुपूर्द केली. नंतर दक्षिण पूर्व आशियामध्ये सुभाषचंद्र बोसचे आगमन आणि आईएनएचे पुनरुज्जीवन झाल्यानंतर आझाद हिंदला मार्ग देण्याआधी लीग त्यांच्या नेतृत्वाखाली आली.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

दक्षिण–पूर्व आशिया व्यापल्यामुळे, मोठ्या प्रमाणावर प्रवासी भारतीय लोकसंख्या जपानच्या ताब्यात आली होती. युद्ध मलायापर्यंत पोहोचण्यापूर्वीच स्थानिक भारतीय संघटनांची चौकट अस्तित्वात होती. यापैकी सर्वात मोठे म्हणजे युद्धपूर्व सेंट्रल इंडियन असोसिएशन, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीग आणि इतर संघटनांचा समावेश होता आणि त्यांच्या सदस्यांमध्ये प्रख्यात भारतीय प्रवासी होते, उदा.केपीके मेनन, नेद्यम राघवन, प्रीतम सिंग, एससी गोहो आणि इतर. व्यवसाय प्राधिकरणाच्या प्रोत्साहनाने, या गटांनी स्थानिक भारतीय स्वातंत्र्य लीगमध्ये एकत्र येण्यास सुरुवात केली आणि स्थानिक भारतीय लोकसंख्या आणि जपानी व्यापाऱ्यांमधली प्रमुख संपर्कसंस्था बनली. इंडियन इंडिपेंडन्स लीगमध्ये सामील झाल्यामुळे सुरक्षा आणि फायदे मिळाले. आयआयएल कार्ड दाखवल्याने रेल्वे तिकिटाची खरेदी सुलभ झाली आणि टूथपेस्ट आणि साबण यासारख्या कठीण वस्तूंच्या आयआयएल मुख्यालयात वाजवी किमतीत खरेदी करता आली. हे एक साधन होते ज्याद्वारे रेशन जारी केले जात असे. याशिवाय आयआयएलला स्विस रेडक्रॉससोबत काम करण्याची परवानगी असल्याने सदस्यांना पत्रे मिळू शकत होती आणि सिलोनसारख्या ठिकाणी पोहोचणे कठीण होते.

रासबिहारी बोस हे एक भारतीय क्रांतिकारक होते, ज्याने सन १९१२च्या दिल्ली–लाहोरच्या कटाची योजना तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्जच्या हत्येसाठी केली होती आणि १९१५च्या गदर कटात त्यांचा सहभाग होता. राजाच्या शोधात रास बिहारी जपानला पळून गेले होते जिथे त्यांना सापडले. जपानी देशभक्त समाजातील अभयारण्य ठरले होते. त्यानंतर रास बिहारी बोस यांनी जपानी भाषा शिकली, एका जपानी महिलेशी लग्न केले आणि ते जपानी नागरिक बनले. मलायन मोहिमेच्या आधी आणि दरम्यान, रास बिहारी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या उद्दिष्टांसाठी जपानी प्रयत्नांमध्ये रस घेण्याचा प्रयत्न केला होता. फुजिवारा येथील उत्साहवर्धक अहवाल आणि स्थानिक स्वातंत्र्य लीगच्या स्थापनेसह, आईजीएचक्यूने आकार घेत असलेल्या भारतीय चळवळीचा विस्तार आणि एकत्रीकरण करण्यासाठी रास बिहारींची मदत मागितली. रास बिहारी यांनी आईजीएचक्यूला विकसित होत असलेल्या आईएनएला एका राजकीय संघटनेशी जोडण्याचा सल्ला दिला जो दक्षिण–पूर्व आशियातील नागरी भारतीय लोकसंख्येसाठी देखील बोलेल.

मार्च १९४२मध्ये त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लीगच्या स्थानिक नेत्यांना टोकियो येथे एका परिषदेसाठी आमंत्रित केले. हे आमंत्रण स्वीकारण्यात आले आणि दि.२८ मार्च १९४२च्या अखेरीस टोकियो हॉटेलमध्ये शिष्टमंडळ भेटले. टोकियो परिषद मात्र कोणत्याही निश्चित निर्णयापर्यंत पोहोचू शकली नाही. रास बिहारी यांच्याशी अनेक भारतीय शिष्टमंडळाचे मतभेद होते, विशेषत: जपानशी त्यांचे प्रदीर्घ संबंध आणि दक्षिण–पूर्व आशियामध्ये कब्जा करणारी शक्ती म्हणून जपानची सध्याची स्थिती पाहता आणि जपानी हितसंबंधांपासून सावध होते. परिषदेने भविष्यातील तारखेला बँकॉकमध्ये पुन्हा भेटण्याचे मान्य केले. भारतीय शिष्टमंडळ रास बिहारीसोबत एप्रिलमध्ये सिंगापूरला परतले.

सिंगापूरमध्ये रास बिहारी यांना एका सार्वजनिक सभेच्या अध्यक्षतेसाठी आमंत्रित करण्यात आले होते. ज्यामध्ये ऑल–मलायन इंडियन इंडिपेंडन्स लीगची घोषणा होती. लीगचे प्रमुख नेद्यम राघवन, एक पेनांग बॅरिस्टर आणि एक प्रमुख मलायन भारतीय होते. प्रशासकीय मंडळात केपी केशवा मेनन आणि एससी गोहो, सिंगापूर इंडियन इंडिपेंडन्स लीगचे नंतरचे अध्यक्ष होते. लीगने कार्यकारी शाखा म्हणून कृती परिषदेची निर्मिती, प्रादेशिक लीग ज्याला अहवाल देतील अशा मंडळाची निर्मिती, तसेच आईएनए आणि कौन्सिलमधील संबंध तसेच परिषद आणि जपानी प्राधिकरण. या प्रस्तावांवर टोकियो येथे भेटलेल्या प्रतिनिधींनी आणि जपानी भूमीपेक्षा इतरत्र झालेल्या बैठकीत मतदान करण्याचा निर्णय घेण्यात आला. अशाही सूचना आहेत की लीगचे सदस्य, ज्यात निरंजन सिंग गिल यांचा समावेश होता, ज्यांनी पीओडब्ल्यू शिबिरांचे दिग्दर्शन केले होते, ते लीग आणि स्वातंत्र्य चळवळीच्या संदर्भात जपानी हेतूंबद्दल घाबरले होते. लीगला भारतीय लोकांमध्ये व्यापक पाठिंबा मिळाला; ऑगस्टच्या अखेरीस सदस्यसंख्या शंभर–हजाराच्या जवळपास असल्याचा अंदाज होता. युद्धकाळातील आणीबाणीच्या मध्यभागी आणि व्यावसायिक अधिकाऱ्यांशी व्यवहार करताना लीगमधील सदस्यत्व लोकसंख्येसाठी फायदेशीर होते. लीगच्या सदस्यत्व कार्डाने धारकाची ओळख भारतीय आणि एक सहयोगी म्हणून केली होती, त्याचा वापर रेशन जारी करण्यासाठी केला जात असे. पुढे लीगने स्थानिक भारतीय लोकसंख्येची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले, ज्यात आता बेरोजगार मजुरांचा समावेश आहे.

!! भारतीय स्वातंत्र्य लीग स्थापना दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## नागरिकांच्या तक्रारीकरीता निवडणूक निरीक्षक राहणार उपलब्ध

### सामान्य, कायदा व सुव्यवस्था आणि खर्च निरीक्षक जिल्ह्यात दाखल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची निवडणूक पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिल २०२४ रोजी होणार असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे सामान्य निवडणूक निरीक्षक, कायदा व सुव्यवस्था निरीक्षक आणि खर्च निरीक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. तिनही निवडणूक निरीक्षक नागरिकांच्या सुचना / तक्रारी ऐकण्यासाठी वन अकादमी येथे उपलब्ध राहणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे. सामान्य निवडणूक निरीक्षक म्हणून मध्यप्रदेशचे अन्न नागरी पुरवठा तथा ग्राहक संरक्षण विभागाचे सचिव लोकेशकुमार जाटव (मो.९४०४९१२५९३) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथे त्यांचे कार्यालय 'बकूळ' येथे सकाळी १०.३० ते दुपारी १२.३० या वेळेत उपलब्ध राहतील.कायदा व सुव्यवस्था निवडणूक निरीक्षक म्हणून केरळच्या दहशतवादविरोधी पथकाचे पोलिस अधिक्षक सुजीत दास (मो. ९३०७२७४९०७) हे वन अकादमी येथील व्हीव्हीआयपी रेस्ट हाऊस येथील 'शाल्मिक' येथे सकाळी ९.३० ते सकाळी ११ पर्यंत उपलब्ध राहणार आहेत.तर निवडणूक खर्च निरीक्षक हेमंत हिंगोनिया (मो. ९४०४९२११४६) हे नागरिकांचे मत, तक्रारी ऐकूण घेण्यासाठी 'बकूल' व्हीव्हीआयपी कक्ष, कौस्तुभ बिल्डींग, वन अकादमी येथे सकाळी ९.३० ते सकाळी ११ वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत.

## सेलूतील पांडुरंग हॉस्पिटलचा चाळीस वर्षांपासूनचा उपक्रम

### दीडशे वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी



**सेलू । रोहित झोल**

येथील पांडुरंग हॉस्पिटलच्या वतीने सातोना बु. येथील बालानंदस्वामी मंदिरात रविवार २४ मार्च रोजी केहाळहून पैठणला पायी जाणाऱ्या दिंडीतील दिडशे वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून औषधोपचार करण्यात आले. कट्टर वैष्णव कै. नथुराम महाराज केहाळकर यांनी गेल्या चाळीस वर्षापुर्वी जिंतूर तालुक्यातील केहाळ येथून तिर्थक्षेत्र पैठन अशी पायी दिंडी सुरू केली. तेव्हापासून सेलू येथील पांडुरंग हॉस्पिटलचे संचालक डॉ अरविंद बोराडे हे दिंडीतील वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी करून सर्व आजारावर औषधोपचार देत असतात. नथुराम बाबा केहाळकर त्यांचे निधनानंतर गेल्या दहा वर्षापासून रमेश महाराज तुरे हे दिंडीचा वारसा चालवत आहेत. दिंडीमध्ये दीनशे ते तिनशे वारकरी सहभागी असतात. दरम्यान

डॉ अरविंद बोराडे, डॉ अंबादास टाले, डॉ योगेश बोराडे यांनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली. याकामी सुधीर बिडवे, लक्ष्मण घोडके, ऋतूराज शिंदे यांनी सहकार्य केले. यावेळी भारत महाराज पांचाळ यांचे नामसंकिर्तन झाले.

## पत्रकार डॉ.अभिषेक खराडे पाटील यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार जाहीर

### कर्नाटक,महाराष्ट्र,आंध्र प्रदेश,गोवा,मध्य प्रदेश,दिल्ली या राज्यामधील विविध क्षेत्रातील गुणवंतांचा होणार गौरव

**सेलू । प्रतिनिधी**

सेलू येथील दैनिक सेवाशक्ती टाइम्स मराठी चे प्रतिनिधी श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील यांना एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यामध्ये अभिषेक रमेशराव खराडे यांना आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे संयोजन कमिटी यांच्याकडून पुरस्काराचे नियुक्ती पत्र आले असून दिनांक ७ एप्रिल २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे पुढील प्रमाणे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे यशवंत यशा हून उत्तम कोणतीही गोष्ट नाही आणि आपले कौतुक करण्यासाठी याहून चांगली संधी नाही.



श्री डॉ अभिषेक रमेशराव खराडे पाटील राहणार मंठा आपण पत्रकारितेच्या माध्यमातून आपल्या लेखणीतून परखड लिखाण करून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली.तसेच लेखणीतून अनेकांना न्याय देण्याचं अतिशय चांगले काम केलंय खरोखरच कौतुकास्पद आहे आपल्या कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. याची दखल घेऊन एम के फाउंडेशन दिल्ली व दैनिक विशाल क्रांती यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्याला आदर्श पत्रकार भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करीत आहोत. खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा असे नियुक्त पत्र देण्यात आले आहे या पुरस्कार सोहळ्याचे महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा ,आंध्र प्रदेश ,मध्य प्रदेश, दिल्ली येथील विविध क्षेत्रातील गुणवंतांना पुरस्कार देण्यात येणार आहे.

# धर्मक्रांतीचे समाज प्रबोधनकार!



**संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्र्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून ज्ञानवर्धक ही माहिती.... संपादक**

संत तुकाराम हे इ.स.च्या सतराव्या शतकातील एक वारकरी संतकवी होते. त्यांचा जन्म देहु या गावात वसंत पंचमीला–माघ शुद्ध पंचमीला झाला. पंढरपूरचा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकारामांना वारकरी संत जगद्गुरू म्हणून ओळखतात. संत वारकरी संप्रदायातल्या प्रवचन व कीर्तनाच्या शेवटी पुंडलीक वरदे हरी विठ्ठल, श्री ज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय, जगद्गुरू तुकाराम महाराज की जय! असा जयघोष करतात. जगद्गुरू तुकाराम लोककवी होते.

जे का रंजले गांजले!
त्यासी म्हणे जो आपुले,
तोचि साधू ओळखावा!
देव तेथेची जाणावा!

अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी जनसामान्यांना सांगून ईश्वर भक्तीचा सुगम मार्ग दाखवला. संत वारकरी संप्रदायाची अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. सतराव्या शतकामध्ये सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे सुधारक संत म्हणून तुकाराम महाराजांचा उल्लेख केला जातो. तुकाराम महाराज वास्तववादी निर्भीड आणि वेळप्रसंगी समाजातील दांभिकपणावर रोखठोक शब्दांमध्ये प्रहार करणारे संत होते. महाराष्ट्राच्या भूमीमध्ये या काळात अनागोंदी निर्माण झालेली होती. अशा काळात त्यांनी आपल्या साहित्यातून व कीर्तनांतून समाजाला अचूक मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. संत तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. वेदान्त तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. अभंग म्हटला की तो फक्त तुकारामाचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. संत तुकारामांची भावकविता म्हणजे अभंग, हे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्र्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. त्यांचे अभंग खेड्यांतील अशिक्षित लोकांच्याही नित्य पाठांत आहेत.

शुद्ध बीजा पोटी,
फळे रसाळ गोमटी!

भागवत धर्माचा कळस होण्याचे महद्भाग्य त्यांना लाभले. महाराष्ट्राच्या हृदयात अभंगरूपाने ते स्थिरावले आहेत. त्यांच्या अभंगांत परातत्त्वाचा स्पर्श आहे. मंत्रांचे पावित्र्य शब्दकळेत पाझरते. त्यांची प्रत्यक्षानुभूती त्यांच्या भावकाव्यात आहे. त्यांच्या काव्यातील गोडवा व भाषेची रसाळता अतुलनीय आहे. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या आहेत. म्हणून...

संतसमागमी धरावी आवडी।
करावी तातडी परमार्थाची।।

संत तुकारामांच्या अभंगाचा अनेकांनी अनेक अंगानी अभ्यास करून त्यांचे सौंदर्य उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराजांची गाथा



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

ही अखंड ज्ञानाचा स्रोत म्हणून जनसामान्यांच्या मुखांमध्ये कायम आहे. गाथा बुडवली म्हणणाऱ्यांना जनसामान्यांच्या तोंडून मुखोद्गत अभंग ऐकून गाथा जिवंत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव झाला. इंद्रायणी नदीच्या काठावर लाखोंचा जनसमुदाय गाथेतील अभंग म्हणू लागले यावेळी तुकाराम महाराजांना जाणीव झाली की आपले अभंग, आपली गाथा बुडालेली नाही. तर ती जनसामान्यांच्या मुखांमध्ये अखंड जिवंत आहे. आपल्या कार्याची ही खरी यथोचित पावती आहे. खऱ्या अर्थाने संत तुकाराम हे या काळातील लोक संत होते. बहुजन समाजाला जागृत करून देवधर्म यासंबंधी मते लोकांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी ठरले. देव धर्मातील अनागोंदी त्याचप्रमाणे भोळ्या समजुती प्रयत्नपूर्वक नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजमनावरील अंधश्रद्धेचा पगडा दूर करून लोकांना नवा धर्म, नवी भाषा देण्याचं काम संत तुकारामांनी केले. संत तुकारामांचे धर्मक्रांतीचे समाज प्रबोधन आजही समाजाला मार्गदर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग मानवी जीवनाला उपकारक ठरले आहेत लौकिक अर्थाने संत तुकाराम हे आठव्या पिढीतील नायक होते. ज्ञानदेवांनी रचलेल्या भक्ती चळवळीला खऱ्या अर्थाने कळसास नेण्याचे काम हे संत तुकारामांनी केलेले आहे.

काहो दाटुनि होता वेडे।
देव आहे तुम्हां पुढे।।

करुणा भाकत सत्याचे चिंतन केले, त्यावेळी त्यांची सर्व देखभाल आवलीने केली. संत तुकारामांनी स्वतःचा संसार सुखाचा करण्यापेक्षा जगाच्या कल्याणासाठी कीर्तनातून अभंगवाणी रचली, लौकिकार्थाने मायाजालात गुंतले नाहीत. देहूला संत तुकाराम महाराज जेथून वैकुंठाला गेले, त्या स्थानावर नांदुरकीचे एक झाड आहे. तुकाराम बिजेला बरोबर दुपारी १२:०२ वाजता तुकाराम वैकुंठाला गेले, त्या वेळी हा नांदुरकीचा वृक्ष प्रत्यक्ष हलतो, असे सांगितले जाते. संत तुकाराम महाराज हे देहू या गावी जन्मले. संत तुकाराम महाराजांना जगद्गुरू असे संबोधले जाते. जगद्गुरू तुकाराम महाराज हे सदैव हरिनामात गढलेले असायचे. होळी नंतर लगेच दुसऱ्या दिवशी तुकाराम बीज हा दिवस येतो. याच दिवशी जगद्गुरू तुकाराम महाराज हे नांदुरकी वृक्षाच्या छायेखाली ध्यानस्त बसून सदेह वैकुंठधामाला गेले. असे सनातनी संतांचे मत आहे, तर पुरोगामींचे मत आहे, की आजवर सदेह वैकुंठाला कोणीच गेला नाही, त्यांची हत्या करून त्यांचा मृतदेह गायब करण्या आला अन् तसा बनाव करण्यात आला. वैकुंठधाम म्हणजे साक्षात श्री हरि भगवान विष्णू यांचे धाम होय. जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या नावातच राम आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासारख्या एक युगप्रर्वतक महापुरुषाने संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे आशीर्वाद घेऊन आपल्या कार्याला सुरुवात केली होती. यामुळे तुकाराम महाराजांना जगद्गुरू असे संबोधले जाते, ते योग्यच आहे.

तुका सांगे मूढ जना!
देव देहीच पहाना!!

!! तुकाराम बीज निमित्त जगतवंद्य जगद्गुरू संतशिरोमणी तुकाराम महाराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादनाने आत्मिक स्मरण !!

# मी चंद्रकांत खैरेंचे नव्हे तर पक्षाचे काम करणार:अंबादास दानवे यांच्या वक्तव्यामुळे ठाकरे गटात खळबळ; खैरेंच्या अडचणी वाढण्याची शक्यता

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)–**उद्धव ठाकरे गटाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना पुन्हा एकदा उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र, या लोकसभा मतदारसंघातून विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती. असे असतानाही चंद्रकांत खैरे यांच्या नावाची घोषणा झाल्यामुळे अंबादास दानवे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मी चंद्रकांत खैरे यांचे नव्हे तर केवळ पक्षाचे काम करणार, असे म्हणत अंबादास दानवे यांनी पुन्हा एकदा चंद्रकांत खैरे आणि त्यांच्यातील वादाला खतपाणी दिले आहे.

२०१४ तसेच २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत देखील आपण उमेदवारीसाठी इच्छुक होतो. पक्षात असताना एखाद्या उमेदवारीसाठी इच्छुक असणे यात वावगे नाही. मात्र, मला विरोधी पक्ष नेतेपद ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. संपूर्ण राज्याची जबाबदारी माझ्यावर आहे. आम्हाला जसा हट्ट करण्याचा अधिकार आहे तसाच निर्णय घेण्याचा अधिकार पक्षप्रमुखांना आहे. व्यक्ती पेक्षा संघटना महत्त्वाची असते. माझी इच्छा असताना देखील मला उमेदवारी मिळाली नाही. यामुळे थोडेफार वाईट वाटते. मात्र, जी जबाबदारी पक्षप्रमुख देतील ती मी पूर्ण करेल, अशा शब्दात अंबादास दानवे यांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे. मी चंद्रकांत खैरे यांची नव्हे तर माझ्या पक्षाचे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यात उमेदवारीवरून चांगलीच रस्सीखेच पाहायला मिळाली. अंबादास दानवे नाराज असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी काही दिवसांपूर्वी अंबादास दानवे हे महायुती सोबत येणार असल्याचा दावा केला होता. त्यामुळे अंबादास दानवे आता काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यातील पक्षांतर्गत वाद नवा नाही. गेले कित्येक वर्षापासून अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांची एकमेकांवर कुरघोडी होताना दिसते. चंद्रकांत खैरे आपल्याला नेहमीच डावलत असल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी य९६१ आधी देखील केला होता. तर अंबादास दानवे हा माझ्या शिष्य असल्याचे चंद्रकांत खैरे यांनी म्हटले होते. त्यामुळे आता आगामी लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या नाराजीमुळे चंद्रकांत खैरे यांच्या अडचणी वाढतात का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



## राष्ट्रवादीचा पहिला उमेदवार जाहीर:अजित पवार यांनी केली सुनील तटकरे यांच्या नावाची घोषणा



**पुणे–**आगामी लोकसभा निवडणूक अनुषंगाने राज्यात आम्ही एकत्रित चर्चा करून राज्यात ४८ जागांबाबत कोणी कोणती निवडणूक लढवणार आहोत, याबाबत ९९ टक्के काम झाले आहे. २८ मार्च रोजी मुंबईत एकत्रित सर्व जागा घोषित होतील. रायगड लोकसभा मतदारसंघात महायुती उमेदवार म्हणून सुनील तटकरे हे निवडणूक लढवणार आहेत. विविध घटक पक्ष एकत्रित येऊन आम्ही राज्यातील सर्व जागा लढवत असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, धनंजय मुंडे, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, संजय बनसोडे उपस्थित होते.

अजित पवार म्हणाले की, शिवाजीराव आढळराव पाटील हे २० वर्षांपूर्वी आमच्या पक्षातून शिवसेनेत गेले होते, आज ते पुन्हा स्वगृही येत आहेत. त्यांना शिरूर लोकसभा निवडणूक लढवण्यास तिकीट देण्यात येईल, असे स्पष्ट संकेत देखील त्यांनी दिले. भाजपने गेल्या निवडणुकीत २३ तर शिवसेनेने १८ जागी विजय मिळवला होता. त्यामुळे या सर्वांचा विचार करुन जागा वाटप निश्चित केले जात असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कमी जागा मिळत आहे, असे दाखवून चुकीचा प्रचार केला जात असल्याचा दावाही त्यांनी केला.भाजप आणि शिवसेना यांनी ज्या जागा जिंकल्या त्याची त्यांनी मागणी केली. आम्ही आम्हला ज्या जागा पाहिजे त्याबाबत भूमिका घेतली आणि त्याला इतर दोन पक्षांनी सहकार्य केले आहे. आमच्या मंत्र्यांवर एक लोकसभा आणि आमदार यांच्यावर विधानसभा जबाबदारी दिली आहे. आमचे उमेदवार मतदारसंघात नसेल तरी इतर मित्र पक्ष यांच्या सोबत प्रचार यंत्रणा राबवण्याचे निर्देश आहे. जाहीरनामा बाबत चर्चा करून काम सुरू आहे. आमचे पक्षाचे निवडणूक प्रमुख म्हणून याची जबाबदारी धनंजय मुंडे यांना दिली असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

## रायगडमध्ये तटकरेंना शिंदेसेनेची मदत मिळण्याबाबत राष्ट्रवादी साशंक:पालकमंत्रिपदावरून गोगावलेंशी झाला होता वाद

**मुंबई (वृत्तसंस्था)–**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांची रायगड लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र या मतदारसंघात शिंदेसेनेचे आमदार व कार्यकर्ते तटकरे यांना किती मदत करणार, याबाबत राष्ट्रवादीच्या गोटात शंका व्यक्त केली जात आहे.

कारण महायुतीत अजित पवार गटाचा समावेश झाल्यानंतर रायगडचे पालकमंत्रिपद खासदार तटकरे यांच्या कन्या अदिती तटकरे यांना मिळू नये यासाठी शिंदेसेनेचे प्रतोद, आ. भरतशेठ गोगावलेंनी उघडपणे विरोध केला होता. आता ते तटकरेंना सहकार्य करणार का, अशी शंका आहे. २०१९ मध्ये युतीच्या अनंत गितेंना ४,५५,५३० मते पडली होती. आता भाजप गीतेंसोबत नाही. त्यामुळे ही निवडणूक त्यांच्यासाठीही कठीण आहे, असा दावा स्थानिकांकडून केला जात आहे.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मोदी लाट असतानाही सुनील तटकरे रायगड मतदारसंघातून केवळ ३१,४३८ मतांनी विजयी झाले. त्यांनी शिवसेना भाजप युतीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गिते यांचा पराभव केला होता. या वेळी तटकरेंना भाजप, शिंदेसेनेचा पाठिंबा आहे. तर शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गट आणि शेकाप त्यांच्या विरोधात आहेत. ठाकरे गट या वेळीही अनंत गिते यांना उमेदवारी देणार असल्याचे मानले जात आहे.



## जिल्हा सामान्य रुग्णालयात जागतिक क्षयरोग दिन

**वर्धा । प्रतिनिधी**

येथील सामान्य रुग्णालयातील जिल्हा क्षयरोग केंद्रामध्ये दि.२६ मार्चला जागतिक क्षयरोग दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सचिन तडस होते तर विशेष अतिथी म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पराडकर ,
डॉ. राजेश सरोदे, डॉ. चारुलता सूर्यवंशी वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.हेमंत पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन साधना कोसरे यांनी केले.यावेळी डॉ. आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क वर्धा. येथील एम एस डब्ल्यू चौथ्या सेमिस्टरचे विद्यार्थि वैद्यकीय व मानसोपचार सेवा क्षेत्र विशेषकरणांतर्गत क्षयरोग दिनानिमित्त पथनाट्य सादर करण्यात आले. या कार्यक्रमात अंकिता मगरदे ,पायल



गुजरकर, मोहित कांबळे ,पायल डाहारे, निकिता लोखंडे ,प्रांजली थुल, काजल मोरे ,प्रतिक्षा घवघवे या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. डॉ.सुमंत ढोबळे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या युवकांना दिलासा:अर्ज करण्या साठी १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**मुंबई–**पोलिस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी एक चांगली बातमी आहे. या भरतीसाठी अर्ज करण्यासाठी आता मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्यसरकारने घेतला आहे.अर्ज करण्याची पहिली मुदत ही ३१ मार्च होती. त्यामध्ये आता वाढ होऊन इच्छुकांना १५ एप्रिलपर्यंत अर्ज करता येणार आहे. मराठा आरक्षणासाठी लागणारे एसईबीसी प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे.अंतिम दिनांकापूर्वी काही उमेदवारांना तांत्रिक अडचणींमुळे प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत असल्यास अशा उमेदवारांनी प्रमाणपत्र मिळणेसाठी केलेल्या अर्जाची पोचपावतीसह आवेदन अर्ज सादर करावा. मात्र कागदपत्र पडताळणीवेळी त्यांच्याकडे विहित नमुन्यातील सर्व कागदपत्रे असणे आवश्यक असल्याचे आदेशात म्हटले आहे.महाराष्ट्र माध्यामिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे



अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष म्हणून घोषित केलेली परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## ज्योती मेटे यांचा अप्पर सहनिबंधक पदाचा राजीनामा बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्यावर ठाम

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदारसंघातून महाआघाडीच्या उमेदवार म्हणून ज्योती विनायकराव मेटे यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. त्यातच त्यांनी त्यांच्या अप्पर सहनिबंधक पदाचा राजीनामा दिला असून आपण राजकारणात सक्रिय सहभागी होण्यासाठीच पदाचा राजीनामा दिला असल्याची माहिती त्यांनी आज कार्यकर्त्यांच्या बैठकीत दिली. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर त्या बीडमध्ये दाखल झाल्या असून त्यांनी स्व. विनायक मेटे यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आपण बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्यास इच्छुक



असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.बीड लोकसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाने पंकजा मुंडे यांना उमेदवारी दिली आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या वतीने या जागेवर ज्योती मेटे यांनी उमेदवारी द्यावी, असा आग्रह शरद पवार यांच्याकडे केला आहे. ज्योती मेटे यांनी शरद पवार यांची दोन वेळा या संदर्भात भेट देखील घेतली ओ. त्यामुळे बीड लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या ज्योती मेटे याच उमेदवार असतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. मात्र, याबाबत शरद पवार यांनी त्यांचा निर्णय जाहीर केलेला नाही. मात्र, असे असले तरी ज्योती मेटे यांनी बीड लोकसभा मतदारसंघातून लढवण्याची तयारी सुरू केली आहे.बीड लोकसभा मतदारसंघात विनायक मेटे यांचे मोठे काम होते. आरक्षणाच्या लढ्यात त्यांनी समाजातील प्रत्येक वंचित घटकाला आपल्या सोबत जोडले होते. याच माध्यमातून बीड मधील जनता ज्योती मेटे त्यांना विजयी करतील, असा विश्वास त्यांचे कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. त्यामुळे ज्योती मेटे यांनी महाविकास आघाडी कडून उमेदवारी मागितली आहे. महाविकास आघाडीच्या वतीने उमेदवारी मिळाली नाही तर ज्योती मेटे या अपक्ष निवडणुकीला सामोरे जाण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे.

# विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी पी.एम-उषा योजना महत्वपुर्ण ठरेल -कुलगुरु डॉ.प्रशांत बोकारे

**गडचिरोली । प्रतिनिधी**

विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा तसेच सर्वांगीण विकासासाठी पीएम-उषा योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून १०० कोटी रुपये निधी गोंडवाना विद्यापीठास मंजूर झाला आहे. विद्यापीठाच्या बळकटीकरणासोबतच शिक्षण, संशोधन व कौशल्याच्या संधी येथील विद्यार्थ्यांना मिळतील. चांगल्या योजना व उपक्रम राबविता येईल. आणि त्याचा जास्तीतजास्त लाभ विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना होईल त्यामुळे विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी पीएम-उषा योजना महत्वपुर्ण ठरेल, असा विश्वास कुलगुरु डॉ.प्रशांत बोकारे यांनी व्यक्त केला.

पीएम-उषा योजनेच्या अनुषंगाने, गोंडवाना विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद, सभागृह येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते.सभेला, कुलगुरु डॉ.प्रशांत बोकारे यांच्यासह, रुसाचे सहसंचालक राहुल म्हात्रे, प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे, सल्लागार प्रमोद पाबरेकर, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे, लेखा व वित्त अधिकारी भास्कर पठारे, डॉ.दिनेश नरोटे, डॉ. उत्तमचंद कांबळे, डॉ. प्रिया गेडाम, डॉ.अनिता लोखंडे, डॉ. नंदकिशोर माने, डॉ. क्रिष्णा कारु तसेच विद्यापीठातील विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.कुलगुरू डॉ. बोकारे म्हणाले, शासनाकडून मिळालेल्या अनुदानाद्वारे विद्यापीठाचा शैक्षणिक दर्जा सुधारणे हा मुख्य उद्देश आहे. सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यासंदर्भात श्री. राहुल म्हात्रे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. पीएम-उषा योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून विद्यापीठास १०० कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे. या योजनेअंतर्गत मेरु साध्य करण्यासाठी उद्देश स्पष्ट असणे आवश्यक आहे. याकरीता नमूद बाबींचा प्रकल्प अहवाल अद्ययावत करण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत ४४ बाबी साध्य करण्यासाठी विभाग प्रमुखांच्या टिमचे प्राधान्य राहील आणि योजनेत मिळालेल्या अनुदानातून जलद गतीने कामे केल्या जाईल, असे कुलगुरू डॉ. बोकारे



म्हणाले.रुसाचे सहसंचालक राहुल म्हात्रे म्हणाले, देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमधील गुणवत्ता सुधारणे आणि उच्च शिक्षणासाठीच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) ही योजना २०१३ मध्ये सुरु केली. त्यानंतर या योजनेचा दुसरा टप्पा २०१८ मध्ये राबविण्यात आला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने या योजनेचा तिसरा टप्पा पीएम-उषा या नावाने २०२३ मध्ये जाहीर करण्यात आला. पीएम-उषा योजनेत मेरू हा घटक नवीन आहे. मेरू घटकांतर्गत १०० कोटी रुपये निधी विद्यापीठास मंजूर झाले. हा निधी खर्ची करणे ही शासनाने मोठी जबाबदारी आपल्याला दिली आहे. तसेच पीएम उषा योजनेंतर्गत महाविद्यालयाला प्रत्येकी ५ कोटी रु. इतका निधी मिळणार असल्याचे श्री. म्हात्रे यांनी सांगीतले. तसेच योजनेसंदर्भात महत्त्वपूर्ण बाबी सांगितल्या.

सल्लागार प्रमोद पाबरेकर म्हणाले, विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना अद्ययावत शैक्षणिक सुविधा मिळण्याकरीता सुविधा उभाराव्यात. तसेच विद्यापीठातील विभाग प्रमुखांनी प्रस्ताव असल्यास द्यावेत.विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चिताडे यांनी उत्कृष्टपणे प्रस्तावाचे सादरीकरण केले. कुलसचिव डॉ.अनिल हिरेखण यांनी टिमच्या सहकार्याने व समन्वयाने सदर ४४ बाबीचे आव्हान विहीत वेळेत पुर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करत उपस्थितांचे आभार मानले.पी.एम.-उषा योजनेंतर्गत पायाभूत सुविधा व बांधकाम, रिनोव्हेशन ण्ड अपग्रेडेशन, वैज्ञानिक उपकरणांची खरेदी, सॉफ्ट कम्पोनन्ट असा निधी प्राप्त होणार आहे.

# सुधीर मुनगंटीवार म्हणजे कर्तृत्व-वक्तृत्व-नेतृत्वाचा तिहेरी संगम-उपमुख्यमंत्री फडणवीस

## सुधीरभाऊंना ऐतिहासिक विजय प्राप्त करून द्या : चंद्रशेखर बावनकुळे

## चंद्रपूरची तोफ दिल्लीत धडकणार,विकासाचे दुसरे नाव सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सत्तेत परिवर्तन घडवून आणणारे, राज्याला हिरवेगार करणारे आणि चंद्रपूरचा चौफेर विकास साधणारे ना. सुधीर मुनगंटीवार हे नेतृत्व-वक्तृत्व-कर्तृत्व याचा तिहेरी संगम असून त्यांना ऐतिहासिक मतांनी विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रपूर-वणी-आर्णी मतदारसंघातील जनतेला केले.



भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी मंगळवारी, २६ मार्च २०२४ रोजी निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी गांधी चौकात आयोजित करण्यात आलेल्या सभेला उपमुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस संबोधित करत होते. यावेळी मंचावर भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी खा. हंसराज अहिर, खा. रामदास तडस, आ. संदीप धुर्वे, आ. संजीव रेड्डी बोदकुरवार, आ.अशोक उईके, आ. महेश बालदी, आ. प्रशांत ठाकूर, माजी आमदार आशीष देशमुख, संजय धोटे, सुदर्शन निमकर,भाजपा ज्येष्ठ नेते चंदन सिंग चंदेल,भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,भाजपा ज्येष्ठ नेते विजय राऊत,प्रमोद कडू, राजेंद्र गांधी विधानसभा प्रमुख रमेश राजूरकर,लोकसभा विस्तारक रवी बेलूरकर,भाजपा महिला प्रदेश सचिव वनिता कानडे, भाजपा नेते अशोक जीवतोडे,राष्ट्रवादी कांग्रेसचे अध्यक्ष नितीन भटारकर, राजीव कक्कड, भाजपा यवतमाळ जिल्हा अध्यक्ष तारेंद्र बोरडे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीन मत्ते, बंडू हजारे, आरपीआयचे अध्यक्ष गौतम तोडे, हरीश दुर्योधन, सिद्धार्थ पथाडे, डॉ. मंगेश गुलवाडे, संध्याताई गुरनुले, ब्रिजभूषन पाझारे, अलका आत्राम, रामपाल सिंग, विवेक बोढे, राजू गायकवाड,सूरज पेदुलवार, किरण बुटले, प्रजवलंत कडू, सविता कांबळे , नामदेव डाहुले, राखी कंचरलावार, महेश देवकते, विशाल निंबाळकर, आशिष देवतळे, अनिल डोंगरे मित्र पक्षातील सर्व पदाधिकारी व हजारो भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्र पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.ना. सुधीर मुनगंटीवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने संपूर्ण देशातून त्यांना मानवंदना मिळवून दिली. इंग्रजांनी चोरून नेलेली ऐतिहासिक छत्रपतींची वाघनखे परत आणण्यासाठी धडपड केली. अशा अनेक अस्मितेच्या मानकां संदर्भात त्यांनी उत्तम काम केले आहे. त्यांनी विकासाची गंगा आणून चंद्रपूरचा चेहेरामोहरा बदलला आहे. चंद्रपूरचे मुलुख मैदान गाजवणा-या ना. सुधीर मुनगंटीवार यांची तोफ आतापर्यंत मुंबईत धडकत होती आता ती दिल्लीत धडकणार आहे, अशा आशावाद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.ही राज्याची नाही तर देशाची निवडणूक असून देशाचा नेता कोण असेल, देशाचे नेतृत्व कोणाच्या हाती द्यायचे याचा निर्णय जनतेने घ्यायचा आहे. देशामध्ये मोदीजींचे राज्य आणायचे की राहूल गांधींचे हे ठरवायचे आहे. देशाचा विकास करायचा असेल तर सर्व समाजाला जो सोबत घेऊन चालू शकतो, समाजाची दु:ख मांडू शकतो अशा नेत्यालाच निवडून द्या. तसा नेता म्हणजे सुधीर मुनगंटीवार असून त्यांना ऐतिहासिक मतांनी निवडून देण्याचा निर्धार चंद्रपूर-वणी-आर्णी मतदारसंघातील जनतेने करावा, असे आवाहन त्यांनी केले.महाराष्ट्रामध्ये महायुतीचा फॉर्म भरायची सुरुवात कोठून करायची यावर जेव्हा विचारमंथन झाले तेव्हा सर्वांनी एकमताने चंद्रपुरात सुधीर मुनगंटवार यांचे नाव ठरवण्यात आले. ही सुरुवात चांगली झाली आहे. ज्याची सुरुवात चांगली होते त्याचा शेवटही चांगला होतो. त्यामुळे सुधीरभाऊ 'एक नंबर'वर असून आता 'अबकी बार ४०० पार' करून मोदीजींना परत एकदा पंतप्रधान बनवून विकासीत भारत निर्माण करण्याचा संकल्प आपण करायचा आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाले.ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अर्थशास्त्र कळते, त्यांना महाराष्ट्राची नाळ कळते. आतापर्यंत हंसराज अहीर यांनी चंद्रपूरचा विकास केला. त्याच्या दहापट विकास विकास करायचा असेल तर ना. सुधीर मुनगंटीवार हा एकमेव नेता आहे. सर्वांनी एकत्र येऊन सुधीर भाऊंना ऐतिहासिक विजय प्राप्त करून द्यावा, असे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

## शंकरपूर परिसरात वादळ व पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर परिसरात आलेल्या जोरदार वादळाने व पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून वादळामुळे अनेक ठिकाणी झाडे पडल्याच्या घटना घडल्या व उभ्या असलेल्या पिकाचेही नुकसान झाले.



शंकरपूर परिसरातील साठगाव हिवरा कोलारी परिसरात दिनांक २५ मार्च ला सायंकाळी चार वाजताच्या सुमारास भयंकर वादळाने कहर केला. वादळामुळे अनेक ठिकाणची झाडे कोलमंडली. तर साठगाव येथील शेतकरी विनोद गंगाधर येवले यांच्या शेतातील सौर ऊर्जेचा संच वादळामुळे उडून गेला. त्यामुळे या शेतकऱ्याचे ही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वादळानंतर या परिसरात जवळपास अर्धा तास जोरदार स्वरूपाचा पाऊस झाला. त्यामुळे काढणीला आलेल्या गव्हाचे पिकाचे व इतरही पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच आंबा पिकाचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या आधीच परिसरात मोठ्या प्रमाणात दुष्काळ पडलेला असताना च या वादळ व पावसामुळे शेतकऱ्यांच्या नुसतानी त भर पडली असून त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या परिसराची पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी साठगाव, हिवरा, कोलारी येथील शेतकरी करीत आहेत.

## सहायक संचालक गवई यांनी ग्रामीण रुग्णालय पुलगावला भेट दिली

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक शासकीय ग्रामीण रुग्णालयात २२ मार्च रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास दोन डॉक्टर मद्यधुंद अवस्थेत आढळून आल्याने त्यांच्या विरोधात पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.२४ मार्च रोजी दुपारी ११ वाजण्याच्या सुमारास एक संवाद साधला आरोग्य विभाग नागपूर कडून सहायक संचालक गवई यांनी पुलगाव ग्रामीण रूग्णालयाला भेट दिली.ते पुलगाव ग्रामीण रूग्णालयात सुमारे २ तास थांबले.त्यांनी प्रथम ग्रामीण रूग्णालयात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांशी चर्चा केली व घटनेच्या दिवशीचा कारणांवर बैठक घेतली. नॅस व इतर कर्मचाऱ्यांसह ड्युटीवर व जबाब घेऊन माहिती घेतली सहायक संचालक गवई, प्रभारी डॉ. प्रमोद कोडापे व एम.ओ. डॉ.प्रफुल्ल पाजारे यांच्याशी बंद खोलीत

**डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांची बैठक**

सविस्तर चर्चा करून त्यादिवशी घडलेल्या घटनेबाबत सुमारे तासभर चर्चा केली.डॉ.गवई यांनी डॉक्टर व संपूर्ण कर्मचारी यांना आरोग्य सेवेबाबत गांभीर्याने राहण्याच्या सूचना केल्या.डॉ.गवई यांनी डॉ. व कर्मचाऱ्यांनी रुग्णांशी समन्वय साधला.आणि आरोग्यदायी वातावरण राखण्याच्या सूचना दिल्या.दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास डॉ.गवई नागपूरकडे रवाना झाले. समिती नागपुरातून आल्याची माहिती स्थानिक पत्रकारांना उशिरा मिळाली.तेथे पोहोचल्यावर डॉ.गवई साहेब व डॉ.प्रमोद कोडापे निघून गेले होते, या प्रकरणाची माहिती सध्या ग्रामीण रुग्णालय चे प्रभारी डॉ.प्रमोद कोडापे यांच्याकडून मिळाली. , डॉ कोडापे यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधून तपासासाठी तीन सदस्यांची चौकशी समिती स्थापन करण्यात येणार आहे.चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल असे उत्तर त्यांनी दिले तीन सदस्य कमेटी मधे कोणते सदस्य राहिलं व किती दिवस मधे रिपोर्ट देण्यात येईल असे अनेक प्रश्न गुलदस्त्यात बंद आहे डॉक्टर प्रमोद कोडापे यांच्या जवळ भिडी व पुलगाव ग्रामीण रुग्णालय चे अतिरिक्त इंचार्ज आहे ग्रामीण रुग्णालय मधे फक्त एकमात्र डॉ प्रफुल्ल पाजारे कार्यरत आहे दोन एम.ओ.व एक इंजार्ज डॉ चे पद कितीतरी महिने पासून खाली आहे.

## सेंट जॉन मध्ये रंगपंचमी उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय येथे रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली.रंगपंचमी म्हणजे रंगांचा सण या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो. होली दहनानंतर अंगाची दाह कमी व्हावी तसेच उन्हाचा तडाखा कमी व्हावा आणि थंडावा मिळावा यासाठी एकमेकांच्या अंगावर पाणी उडविण्याची रीत आहे. देशाच्या काही भागात या लोकप्रिय सणाला धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्व आहे.



या दिवशी लोक भरपूर रंग खेळून आनंद अनुभवतात. फूलांच्या पाकळ्या, मेंदी,पळसाची पाने, टोमॅटो, हळद, डाळीचे पीठ, बीट अशा नैसर्गिक पदार्थांपासून रंग तयार केले जाते.नर्सरी ने इयत्ता दुसरीच्या विद्यार्थामध्ये हा उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री संतोषजी यादव उपप्राचार्या सौ आरती कुरझडकर मॅडम उपप्राचार्य श्री महेंद्रजी भोयर हे प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच त्यांनी चिमुकल्यांना रंग लावून रंग खेळण्याचा आनंद घेतला. प्राचार्य श्री संतोषजी यादव यांनी मुलांना सुरक्षित रंगपंचमी कशी खेळावी व आपल्या त्वचेची या कृत्रिम रंगांपासून कशी काळजी घ्यावे याचे मार्गदर्शन केले.तसेच पाणी हे जीवन असून पाणी जपून वापरावे असा संदेश त्यांनी दिला. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सुद्धा एकमेकांना रंग लावून रंगपंचमीचा आनंद लुटला.

## ज्ञानस्पर्श अभ्यासिका वरोरा तर्फे वर्षपूर्ती तथा स्पर्धा परीक्षा कार्यक्रम संपन्न

**वरोरा । प्रतिनिधी**

येथील ज्ञानस्पर्श वाचनालयाच्या वतीने ज्ञानस्पर्श अभ्यासिका वर्षपूर्ती तथा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन सिद्धिविनायक मंगल कार्यकाय येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला मुख्य मार्गदर्शक म्हणून दीपस्तंभ फाऊंडेशनचे दिलीप पाटील उपस्तिथ होते.यावेळी उपस्तिथ विद्यार्थाना मार्गदर्शन ते म्हणाले कि, ऑनलाईन क्लासेस हा स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा पर्याय नाही,स्पर्धा परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर बेसिक कडे लक्ष द्या म्हणे पॅड तुमच्या मागे धावेल तुम्हाला पदाच्या मागे धावायची गरज पडणार नाही असे प्रतिपादन याप्रसंगी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदा जीवन विकास केंद्राचे संचालक गजानन सोनवणे होते.यावेळी त्यांनी खडतर परिस्तिथीतून मार्ग कडून यश कसे संपादन करावे याबाबत मार्गदर्शन केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अशोक पाटील तसेच नुकतेच कृषी अधिकारी म्हणून नियुक्त झालेले आकाश गेडाम व विशाल विरुटकर उपस्तिथ होते. पाहुण्याच्या हस्ते मागील वर्षभरात स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थाना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालय ज्ञानस्पर्श अभ्यासिकेचे संचालक सुरेंद्र उरकांडे यांनी केले तर प्रास्ताविक पवन कष्टी यांनी केले व आभार शिवा पंधरे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश देवाळकर, प्रकाश देवाळकर,संकेत धानोरकर यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.






## वरोरा येथे गोवंश तस्करांवर कारवाई, १५ गायांची सुटका

**वरोरा**-चंद्रपूर जिल्हयात वरोरा शहरातुन तीन चारचाकी वाहनात जवळपास १५ गाय कत्तलसाठी जात असल्याची माहिती राजे छत्रपती सेनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष योगेश वाळके व त्यांच्या सहकार्यांना मिळाली त्या आधारावर वरोरा पोलीस स्टेशनला गोवंश तस्काराबाबतची माहीती दिली. वरोरा पोलीस स्टेशनने तात्काळ कारवाई करत वाहन चालक सहित ५ तस्कारांवर गुन्हा नोंद करून कारवाई केली. चंद्रपूर जिल्हयात दिवसेंदिवस गोवंश तस्करांची संख्या वाढत असून अनेक गायी कत्तलीसाठी परराज्यात विक्री होत आहे. गोरक्षक व इतर सामाजिक संगठनाच्या माध्यमातुन अनेक गोवंशाना जीवनदान मिळत आहे.

### शेगावची करिष्मा बनली सहाय्यक प्रकल्प अधिकारी

# शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केला सत्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेगाव येथील सर्व सामान्य कुटुंबातील करिष्मा अशोक निखारे हिने एमपीएससी परीक्षेत यश संपादन करून द्वितीय श्रेणी अधिकारी बनण्याचा मान मिळविला आहे.यामध्ये तिची सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. तिच्या यशाबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यासह पदाधिकारी व शिवसैनिकांनी करिष्मा व तिच्या आईवडिलांचा सत्कार केला.





शेगाव येथे छोटीशी चाय टपरी चालवणारे अशोक निखारे यांची मुलगी कु. करिश्मा अशोक निखारे हिने २०२२ मध्ये झालेल्या एमपीएससी परीक्षेत यश संपादन करत गावासमोर आदर्श निर्माण केला आहे. करिश्माचे प्राथमिक शिक्षण हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शेगावं येथे ४ थी पर्यंत व ५ ते १० पर्यंत चे शिक्षण संत काशिनाथ महाराज कन्या विद्यालय, शेगाव बु. येथून पूर्ण केले. त्या नंतर तिने ११ व १२ वि चे शिक्षण आनंद निकेतन कॉलेज वरोरा येथून पूर्ण केले व अंजुमन कॉलेज अँड टेक्नॉलॉजी नागपूर इथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले आहे. घरची परिस्तिथी हलाकीची असताना सुद्धा इथ पर्यंत शिक्षण घेऊन सुद्धा नोकरी न मिळाल्याने तीने नंतर स्पर्धा परीक्षेची तयारी २०१७ ला घरूनच सुरू केली.त्या नंतर २०२३ ला ती पुणे इथे क्लासेस साठी गेली.करिश्मा ची आई घरी शिवणकाम करुन वडिलांना घर चालवायला हातभार लावते. त्यामुळे तीच्या या यशा बद्दल सम्पुर्ण गावातून तीच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या या यशाचे कौतुक म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख मुकेश जिवतोडे यांच्यासह येथील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी करिष्मा व तिच्या आईवडिलांचा सत्कार केला.यावेळी माजी युवासेना जिल्हाप्रमुख व गोंदिया जिल्हा विस्तार मनीषज जेठानी, उपजिल्हा प्रमुख अमित निब्रड, उपतालुका प्रमुख राजू राऊत,पंचायत समिती भिवापूरचे माजी सभापती वामन निखाडे उपसरपंच साधना मानकर, ग्रामपंचायत सदस्य रेखा दडमल, प्रफुल वाढई, सतीश गायकवाड,रवी वाटकर, असलम पठाण, तुळशीराम घोडमारे,राकेश इखार, सतीश कोटकर व आदी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .